## नियमित दिवाणी दावा क्र.१/२०१५
## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००००३–२०१५

### निशाणी क्र.३४७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी तर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.१५अ शारदा गणपत पुजारे हिचे दि.३०/०१/२०२६ रोजी मुंबई येथे निधन झाले आहे. सदर प्रतिवादीला प्रतिवादी क्र.१५ब ते १५ ड हेच कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरीक्त अन्य वारस नाहीत. सदरचे वारस या दाव्याचे कामी सामील असल्याने प्रतिवादी क्र.१५अ चे नाव दाव्यातून कमी करणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी क्र.१५अ चे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन हरकत नसल्याचे कथन केले आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी ताकिदी करिता दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मयत प्रतिवादी क्र.१५अ शारदा गणपत पुजारे या दि.३०/०१/२०२६ रोजी मयत झाल्या आहेत या बाबत कोणताही आक्षेप नोंदवलेला नाही. वादी यांच्या कथना नुसार मयत प्रतिवादी क्र. १५अ यांचे वारस पुर्वीपासूनच अभिलेखावर आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. १५अ यांचे निराळे वारस अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. तरी वादी यांच्या अर्जातील कथनांचा विचार करता वादी मागणी करतात त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती

करण्यास परवानगी देण्यास कोणतीही अडचण दिसत नाही. तसेच दाव्यात वादी मागणी करतात त्याप्रमाणे दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. याउलट दावा मिळकती मधील वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण होण्यासाठी वादी यांनी अर्जात दिल्या प्रमाणे दुरुस्ती करणेस हरकत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.३४७ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.11 16:54:13 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः ११/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड